## स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांकः- १९/०२/२०१७

### सिन्नर येथील सेंट्रल बॅंक फोडणारे सराईत गुन्हेगार स्थानिक गुन्हे शाखेचे जाळयात घरफोडी व मोटर सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस

---

सिन्नर शहरात गतवर्षी २९ सप्टेंबर रोजी रात्रीचे सुमारास अज्ञात आरोपीतांनी **सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया सिन्नर शाखेची पाठीमागील भिंत** फोडुन अनाधिकृतपणे बॅंकेत प्रवेश करून बॅंकेतील सी.सी.टी.व्ही. कॅमेरे व डिव्हीआर मशिनची तोडफोड करून घरफोडी केली, तसेच बॅंकेतील रोख रक्कम असलेली तिजोरी लुटण्याचा प्रयत्न केला असता सायरनचा आवाज झाल्याने चोरटयांनी तेथुन पळ काढला होता. सदर घटनेबाबत सिन्नर पोलीस ठाणेस दिनांक २९ सप्टेंबर २०१७ रोजी । गुन्हा रजि.नं. १६९/२०१७ भादवि कलम ४५७,३८०,४२७ प्रमाणे घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयातील आरोपी हे गुन्हा घडल्यापासुन फारार होते.

नाशिक जिल्हयातील वाढत्या चो-या व घरफोडीचे गुन्हयांना प्रतिबंध होणेसाठी नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री.संजय दराडे सो.** व **अपर पोलीस अधीक्षक श्री. विशाल गायकवाड सो** यांनी जिल्हा अभिलेखावरील रेकॉर्डवरील गुन्हेगारांचा आढावा घेवुन गुन्हे उघडकीस आणणेसाठी सुचना देवुन मार्गदर्शन केले होते. त्याप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी जिल्हयातील नाउघड चोरी व घरफोडीचे गुन्हे, तसेच मोटर सायकल चोरीचे गुन्हे करणारे गुन्हेगारांची गुन्हा करण्याची पध्दत व त्यांचे ठाव-ठिकाणाबाबत गोपनीय माहिती काढणेबाबत स्थागुशाचे पथकास सुचना दिल्या होत्या. दिनांक १८/०२/२०१८ रोजी स्थागुशाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी असे रेकॉर्डवरील गुन्हेगारांचा शोध घेत असतांना **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांना खब-यांमार्फत गुप्त बातमी मिळालेवरून ओझर परिसरात घरफोडी करणारे काही गुन्हेगार वास्तव्यास असलेबाबत समजले. त्याप्रमाणे स्थागुशाचे पथकाने ओझर येथील आंबेडकर नगर परिसरात सापळा रचुन संशयीत इसम नामे **१) स्वप्निल उर्फ भुषण सुनिल गोसावी, वय १९, रा. देवीमंदिर रोड, सिन्नर** यास शिताफिने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले इसमास तपासाचे कलाकौशल्य वापरून चौकशी केली असता त्याने त्याचे साथीदार नामे **२) अर्जुन गोरख धोत्रे, वय २३, रा. इदगाह मैदानाचे पाठीमागे, सिन्नर** हल्ली श्रमिक नगर, जेलरोड नाशिकरोड, **३) करण प्रकाश घुगे, रा. इदगाह मैदानाचे पाठीमागे, सिन्नर** यांचेसोबत सन २०१७ मध्ये सप्टेंबर महिन्यात सिन्नर येथील सेंट्रल बॅंकेचे पाठीमागील बाजुची भिंत फोडुन बॅंकेत प्रवेश करून रोख रक्कम चोरी करण्याचा प्रयत्न केल्याची कबुली दिली आहे. सदर गुन्हयातील आरोपी नामे अर्जुन धोत्रे यास नाशिक व करण घुगे यास सिन्नर येथुन ताब्यात घेण्यात आले असुन त्यांनी **सिन्नर व ओझर येथे मोटर सायकल चोरी व घरफोडीचे गुन्हे केल्याची कबुली** दिली आहे.

सदर आरोपीतांचे कब्जातुन ०२ स्प्लेंडर, ०१ पल्सर व ०१ ॲक्टीव्हा अशा एकुण ०४ चोरीच्या मोटर सायकल, तसेच घरफोडयांमधील चोरीची रोख रक्कम व मोबाईल फोन असा **एकुण १,२८,५०० रू. चा मुद्देमाल** हस्तगत करण्यात आला आहे. सदर आरोपीतांनी कबुली दिले वरून सिन्नर पो.स्टे. । गुरनं ४२/२०१७ भादविक ३७९, तसेच । गुरनं १६९/२०१७ भादवि कलम ४५७,३८०,४२७, व ओझर पो.स्टे. । गुरनं २३/२०१८ भादवि कलम ४५४,४५७,३८० असे एकुण ०२ घरफोडी व ०१ मोटर सायकल चोरीचा गुन्हा उघडकीस आलेला आहे. सदर आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन त्यांचेकडुन वरील गुन्हयांचे तपासात अजुन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयातील विविध भागातुन चोरीस गेलेल्या मोटर सायकल हया बनावट नंबर प्लेट बनवुन वापरल्या जातात, यासाठी ग्रामीण पोलीसांतर्फे नंबरप्लेट बनविणारे दुकानधारकांना आवाहन करण्यात येते की, दुचाकी अथवा चारचाकी वाहनांच्या नंबरप्लेट बनविण्याकरीता येणारे इसमांकडुन गाडयांचे आर.सी.बुक, लायसन्स परवाना, तसेच संबंधीत इसमाचे आधारकार्ड असे कागदपत्रांची पडताळणी करून त्याच्या छायांकित प्रति घ्याव्यात व त्याची स्वतंत्र रजिष्टरला नोंद घेवुनच नंबरप्लेट तयार करण्यात यावी. चोरीच्या वाहनांना बनावट नंबर प्लेट तयार करून देणारे इसमांचा पोलीस पथक शोध घेत असुन यापुढे त्यांचेवरही कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो.** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे,** सहा.पोलीस निरीक्षक राम करपे, सपोउनि संजय पाटील, पोहवा प्रकाश चव्हाणके, रविंद्र वानखेडे, कैलास देशमुख, मुनिर सैय्यद, पोना दिलीप घुले, पोना प्रितम लोखंडे, रावसाहेब कांबळे, पोकॉ सुशांत मरकड, मंगेश गोसावी, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम अशांचे पथकाने वरील आरोपीतांना ताब्यात घेवुन घरफोडी व मोटर सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणलेले आहे.